## एक रेष आखलेली

भय आहे इथे
किंकाळ्या न् तडफडणाऱ्या मांड्या
एखादा तारा तुटल्यागत
तुटतं स्वप्न भयंकर
न् कायमचं घर करुन राहतं मनात

चांदणं आहे इथे
चमचमत्या पाण्यात कालवून ठेवलेलं
वारा कुठल्यातरी अनाकलनीय ग्रहावरचा
एक पक्षी विभोर
टक लावून पाहणारा
मला माहीत आहे
इथेच आहे प्रेम
दगड न् धोंडे
एक हिरवीगार फांदी लवलवत येणारी
कोलाहल सगळा वाहत्या नद्या
चुंबनांसारखं उद्दिपित करणारं संगीत
न् कायमच्या दूर निघून गेलेल्या दुखऱ्या घायाळ स्मृती

सूर्योदय
अथवा सूर्यास्त
म्हणतात कुणी याला
किंवा मावळतं वर्षही
मी इथेच राहते

कितीतरी वर्ष न् शतकं
पण कागदावर नाहीये माझं अस्तित्व
ना माझं
ना माझ्या आईचं
ना माझ्या धाकट्या भावाचं
जो विलक्षण आश्वस्त होत झोपी जायचा
देशासारखंच चादरीचं एक टोक घट्ट पकडून

एक रेष आखलेली
होती की काय आजवर
आभासमय
स्वतःच्या समजुतीखातर
की इथेच आहे सर्व काही
तू आणि मीही
देहात
असह्य प्राण फुंकणारी

एका फटक्यात नाहीसं होतं सगळं
माझी खापरपणजी मरुन गेली
तेव्हा तिची माती पसरली होती इथे
फुटली असतील तिला एव्हाना
असंख्य रोमहर्षक मुळं
ती कापून काढताना
आकाशाचा नेमका कोणता तुकडा धरायचा मी आता
माथ्यावर
तेवढं जरा सांगाल का?

**प्रज्ञा दया पवार**
ठाणे